

अकलूज, जि. सोलापूर : संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील भव्य असे गोल रिंगण सदाशिवराव माने विद्यालयाच्या प्रांगणात पार पडले.

# कोल्हापुरात धरणसाठ्यात वाढ

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** जिल्ह्याच्या पश्‍चिम भागात गेल्या चार दिवसांच्या तुलनेत बुधवारी (ता. १८) पावसाचे प्रमाण मंदावले असले तरी धरणांतील पाण्यामुळे नदीच्या पाण्याची पातळी वाढलेली होती. बुधवारी दिवसभर पाऊस थांबल्यास गुरुवार पासून पाणीपातळी स्थिर होण्याची शक्यता असल्याचे पाटबंधारे विभागाच्या सूत्रांनी सांगितले. जिल्ह्यातील ८४ बंधारे पाण्याखाली गेले असून पंचगंगा नदीवरील राजाराम बंधाऱ्यावरील पाणीपातळी बुधवारी सकाळी ४३ फूट ८ इंच इतकी होती. पंचगंगा नदीने धोक्याची पातळी ओलांडल्याने नागरिकांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन पाटबंधारे विभागाने केले आहे.

कोयनातून ९ हजार ५४१ क्युसेकचा विसर्ग, वारणा धरणातून १८ हजार २०७ क्युसेकचा विसर्ग, कडवी धरणातून १ हजार ६०८ क्युसेकचा विसर्ग आणि कासारी धरणातून २ हजार २५० क्युसेकचा विसर्ग सुरू आहे. घटप्रभा धरणातून ४ हजार ८७६ क्युसेकचा विसर्ग, जांबरेतून १ हजार २४९ क्युसेकचा विसर्ग, कोदे प्रकल्पातून ६३४ क्युसेकचा विसर्ग सुरू आहे.

# सांगली जिल्ह्यात धग वाढतेय

## तिसऱ्या दिवशीही दूध रस्त्यावर ओतले; कार्यकर्त्यांना घेतले ताब्यात

**सांगली (प्रतिनिधी) :** जिल्ह्यात तिसऱ्या दिवशी ही दूध दराच्या मागणीसाठीचे आंदोलन सुरू होते. कवठेमहांकाळ तालुक्यातील चार चिलिंग सेंटरवर संकलन झालेले दूध किसान सभेच्या कार्यकर्त्यांनी रस्त्यावर ओतले. पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेऊन लगेच सोडण्यात आले. जिल्ह्यात दूध दराबाबत आंदोलनाची धग वाढू लागली आहे.



कवठेमहांकाळ : येथे किसान सभेच्या कार्यकर्त्यांनी बुधवारी (ता. १८) चौकाचौकात दूध ओतून दिले.

जिल्ह्यात बुधवारी (ता. १८) दूध संकलन करण्यासाठी चिलिंग सेंटर मालक फिरू लागले आहेत. जिल्ह्यात सकाळच्या टप्प्यात १ लाख ३८ हजार ९३८ लिटर इतके दूध संकलन झाले. तर मंगळवारी (ता. १७) दिवसभरात ६७ हजार ५०० लिटर दुधाचे संकलन झाले असल्याची माहिती शासकीय दूध संघाच्या सूत्रांनी दिली. जिल्ह्यात दूध संकलन होऊ लागले आहे. याची खबर शेतकरी संघटना आणि किसान सभेच्या कार्यकर्त्यांपर्यंत पोचू लागल्या आहेत. त्यामुळे कार्यकर्ते गनिमी काव्याचा वापर करून संकलन थांबवू लागले आहेत.

कवठेमहांकाळ तालुक्यातील चिलिंग सेंटरवरील जमा झालेले दुधाचे कॅन आणि दूध घेऊन जाणाऱ्या गाड्या अडविण्यात आल्या. गाड्यातून कॅन काढून दूध रस्त्यावर ओतले. तर जिल्ह्यातील काही ठिकाणी दुधाचे वाटप करण्यात आले. आरग येथील दूध संकलन केंद्रात दूध आणू नका, असे निरोप शेतकऱ्यांपर्यंत पोचू लागले आहेत. वाळवा तालुक्यातील राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी गाय दुधाला प्रति लिटर पाचर रुपये अनुदान थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करा, या मागणीसाठी मंगळवारी (ता. १७) मोर्चा काढण्यात आला. तर तासगाव तालुक्यात तालुक्यातून दूध संकलन पूर्णपणे बंद होते.

मंगळवारी (ता. १७) सिद्धेश्‍वर चौकात कार्यकर्त्यांनी दुधविकास राज्यमंत्री जानकर यांचा प्रतिकात्मक पुतळा दहन करून घोषणा दिल्या.

# कोल्हापुरात हिंसक वळण

## टँकर पेटविले, एसटीवर दगडफेक; आज पुणे-बंगळूर महामार्ग बंद पाडणार

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** दूध आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी जिल्ह्यात हिंसक वळण लागले. मंगळवारी रात्री उशिरा जयसिंगपूर व तमलगेजवळ टँकरला आग लावण्यात आली. तर, बुधवारी (ता.१८) सकाळी हेरवाड (ता.शिरोळ) नजीक एका एसटी बसवर दगडफेक केल्याने या मार्गावरील बसगाड्या परिवहन मंडळाने रद्द केल्या. दरम्यान, आंदोलनाबाबत शासन गंभीर नसल्याने स्वाभिमानीच्या कार्यकर्त्यांनी आता टँकर अडविण्याबरोबरच चक्का जामची घोषणा केल्याने आंदोलन तीव्र होणार आहे. दरम्यान, आंदोलकांनी पुणे-बंगळूर महामार्ग रोखणार असल्याचे जाहीर केले आहे. कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील कार्यकर्ते जनावरांसह महामार्गावर येणार आहेत. महामार्गावरच ठिय्या आंदोलन होणार असल्याने परिस्थिती आणखी चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

जिल्ह्यातील दूध संघाच्या संकलनात सलग तिसऱ्या दिवशी अडथळे आले. हातकणंगले, शिरोळ, कागल आदी तालुक्यांतील गावांनी स्वयंस्फूर्तीने दुधाचे संकलन न केल्याने या गोकुळसह अन्य संघांकडे गाड्या आल्या नाहीत. इतर भागातून काही प्रमाणात दूध गोकुळकडे संकलित झाले. मात्र, एकूण संकलनाच्या चाळीस टक्केच दूध संघात आल्याचे संकलन विभागातून सांगण्यात आले.



देवराष्ट्रे, ता. कडेगाव, जि. कोल्हापूर : येथून पोलिस बंदोबस्तात चितळे डेअरीचे चार ट्रक दुपारी २.३० ला कराडच्या दिशेने रवाना झाले.
(छायाचित्र : स्वप्नील पवार).

दरम्यान, दररोज टँकर फोडण्यात येत असल्याने गोकुळ दूध संघाच्या संचालक मंडळाची तातडीची बैठक दूध संघात झाली. या वेळी दूध संकलनाचा आढावा घेण्यात आला. शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी पोलिस बंदोबस्तात टँकर मुंबईकडे पाठविण्याचा निर्णय संचालक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. आंदोलकानी बससेना लक्ष करण्यास सुरवात केल्याने नुकसान होऊ नये याकरिता गुरुवारी बससेवा बंद ठेवण्याबाबत हालचाली सुरू होत्या.

सकाळ अॅग्रोवन
आयोजित
महाधन नजर ठेवा उद्यावर
प्रायोजित
अॅग्रोवन संवाद
'अॅग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद
कार्यक्रम वेळापत्रक
शुक्रवार, २० जुलै २०१८
विषय - उस व्यवस्थापन
वक्ते - श्री. ए. एन. साळुंखे
(उसतज्ज्ञ)
स्थळ - चावडी कार्यालय हॉल, नांद्रे,
ता. मिरज, जि. सांगली
वेळ - सायं. ६ वा.
या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.

# नागनाथअण्णांच्या विचारांचा जागर व्हावा

## माजी मंत्री सुशीलकुमार शिंदे; वाळव्यात जयंतीनिमित्त कार्यक्रम

**वाळवा, जि. सांगली (प्रतिनिधी) :** क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांच्या कार्याचा अंदाज आजच्या पिढीला येऊ शकत नाही. त्यामुळे त्यांचे विचार समाजात रुजविण्यासाठी जागर व्हावा, असे मत काँग्रेसचे नेते सुशीलकुमार शिंदे यांनी व्यक्त केले. तंत्रज्ञानाच्या युगात महात्मा गांधींनाही तरूण विसरते की काय, अशी शंका त्यांनी व्यक्त केली.

पद्मभूषण क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांच्या ९६ व्या जयंती कार्यक्रमात ते बोलत होते. शेकापचे आमदार भाई जयंत पाटील अध्यक्षस्थानी होते. हुतात्मा किसन अहिर मैदानात झालेल्या कार्यक्रमाला मोठी गर्दी होती.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, की नागनाथअण्णांच्या कार्याचा आलेख समाजासमोर यावा. शिवाजी विद्यापीठाने त्यांना डी.लिट. पदवी दिली. मात्र, त्यातून विद्यापीठाचा सन्मान झाला. श्रीमती कुसुमताई नायकवडी यांनी मोदी सरकारचे वाभाडे काढले. निमंत्रक वैभव नायकवडी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अभयकुमार साळुंखे, बाबूराव गुरव, शिवाजीराव काळुंगे, डॉ. सुषमा नायकवडी, नंदिनी नायकवडी, गौरव नायकवडी उपस्थित होते. अण्णांचे कार्यकर्ते एस. आर.



वाळवा, जि. सांगली : क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांच्या जयंती कार्यक्रमात रविवारी बोलताना सुशीलकुमार शिंदे, शेजारी वैभव नायकवडी, आमदार जयंत पाटील, डॉ. देवानंद शिंदे.

पाटील यांनी स्मारक समितीला २२ हजार रुपयांची मदत या वेळी दिली.

जयंत पाटील म्हणाले, हुतात्मा साखर कारखान्याचे काम सहकार चळवळीला मार्गदर्शक आहेत. विधान परिषदेत मला चौथ्यांदा जाण्याचा मान मिळाला. हा नागनाथअण्णांच्या विचारांचा सन्मान आहे. जनतेशी बांधिलकी ठेवून त्यांनी केलेल्या कार्याची नोंद गिनेस बुकात व्हावी.